R.No.MAHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ९५ रविवार दि.१९ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## अखेर महायुतीला तडा गेलाच..! शिंदे गटानंतर आता भाजपकडूनही स्वबळाचा नारा, कुठे-कुठे युती फिसकटली?



हिंगोली : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका शिवसेना हिंगोली जिल्ह्यात स्वबळावर लढवणार आहे. अशी माहिती शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार संतोष बांगर यांनी दिली आहे. या नगरपालिकेत शिवसेना स्वबळावर लढणार असून धनुष्यबाणाचा नगराध्यक्ष आणि नगरसेवक नगरपालिकेमध्ये असतील. हिंगोली कळमनुरी आणि वसमत या तीनही नगरपालिकेमध्ये हीच परिस्थिती असेल.

ज्या ज्या ठिकाणी युती होत असेल तिथे युती करा, जिथे युती होत नसेल तिथे मैत्रीपूर्ण लढत द्या. कुणावरही टीका करायची नाही. आपण आपले काम दाखवायचे आणि पक्षाचे वर्चस्व दाखवून द्यायचे, असा निर्धार संतोष बांगर यांनी यावेळी केला आहे.

एकनाथ शिंदे यांनी सांगितला आहे की, जिथे युती शक्य आहे तिथे युती करा, अन्यथा स्वबळाची तयारी करा आणि त्यानुसार आम्ही कार्यकर्त्यांना सूचना दिल्या आहेत. युती जर केली तर कार्यकर्त्यांवर अन्याय होत असतो. सर्व कार्यकर्त्यांना न्याय मिळावा यासाठी शिवसेना स्वबळावर निवडणुका लढणार आहे. असेही ते म्हणाले.

पाचोरा भडगावमध्ये युती फिसकटली जळगावच्या पाचोरा भडगावमध्ये निवडणुकीपूर्वीच युती फिसकटली आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार किशोर पाटील यांनी अलीकडेच स्वबळावर निवडणूक लढवण्याची घोषणा केली होती. यानंतर भाजपच्या वतीने चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण यांनी तातडीने बैठक घेऊन भाजपही स्वबळावर लढणार असल्याचे जाहीर केले.

त्यामुळे निवडणुका घोषित होण्यापूर्वीच पाचोरा-भडगाव मतदारसंघात युती फिसकटली असून युतीत निवडणुका न लढण्याचा निर्णय घेणारा पाचोरा मतदारसंघ हा राज्यात पहिला ठरला आहे.यामुळे जळगाव जिल्ह्यात महायुतीतील राजकीय वातावरण तापले आहे.

भाजपबरोबर कदापिही जाणार नाही : आमदार किशोर पाटील भाजपबरोबर कदापिही जाणार नाही. माझ्या मतदारसंघात स्वबळावर निवडणुका होतील, अशी घोषणा आमदार किशोर पाटील यांनी केली. विधानसभा निवडणुकीत भाजपने माझ्या विरोधात अमोल शिंदे यांना उमेदवारी दिली. त्यांना विविध प्रकारची मदत केली. त्यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. उलट त्यांना नवी पदे देण्यात आली.

## उदगीर - जळकोट मतदार संघातील आपत्तीग्रस्थांना ५३ लाखांची ह.भ.प. गहिनीनाथ महाराज यांच्या हस्ते मदत वाटप

### माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या प्रयत्नातुन आपत्तीग्रस्थांना शासनाएवढी मदत



उदगीर /प्रतिनिधी:- उदगीर - जळकोट मतदारसंघात एप्रिल २०२५ ते सप्टेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीने उदगीर मतदारसंघातील विविध भागात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. अतिवृष्टीबाधित कुटुंबांना मदत व्हावी म्हणून लातूरचे सुपुत्र आणि प्रसिद्ध उद्योगपती अभय भुतडा यांच्या मार्फत अभय भुतडा फाऊंडेशनच्या वतीने एकुण ७५ आपत्तीग्रस्तांना ५२ लाख १३ हजार ५०० रूपयाची शासनाएवढीच भरीव मदत करण्यात आली असुन आपतीग्रस्त नागरिकांच्या खात्यावर थेट जमा होणार असुन आज ह.भ.प. गहिनीनाथ महाराजांच्या हस्ते अपत्तीग्रस्तांना धनादेशाचे वाटप उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालायाच्या सभागृहात करण्यात आली.

प्रसिद्ध उद्योगपती अभय भुतडा यांच्या अभय भुतडा फाउंडेशनच्या वतीने मतदार संघातील आपत्तीग्रस्तांना भरीव मदत केल्याबद्दल माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी विशेष आभार व्यक्त केले आहेत. यावेळी ह.भ.प. गहिनीनाथ महाराज, माजी आ.गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, भाजपाच्या महिला जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, सुधीर भोसले, मनोज पुदाले, शशिकांत बनसोडे, प्रा.श्याम डावळे, चंद्रकांत टेंगटोल, रामदास बेंबडे, अमोल अनकल्ले, प्रा.शिवाजीराव देवनाळे, शफी हाशमी, अभिजीत औटे, प्रदीप जोंधळे, अमोल निडवदे, डॉ.रामप्रसाद लखोटीया, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, जळकोटचे तहसीलदार राजेश लांडगे, पशुधन विकास अधिकारी डॉ.विजय घोणसीकर, धनाजी मुळे, दिपाली औटे, मधुमती कनशेट्टे, उर्मिला वाघमारे, वर्षा कांबळे, वैशाली कांबळे, काजल मिरजगावे, शामला कारामुंगे, सरोजा वारकरे, उषा माने, शिवकर्णा अंधारे, ॲड.दत्ता पाटील, महेश बसपुरे, बालाजी देमगुंडे, वैजनाथ बिरादार, गणेश गायकवाड, मुकेश भालेराव, अविनाश गायकवाड, आदी उपस्थित होते.

मतदार संघातील बळीराजाच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभा असल्याचे आश्वासन माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी दिली होती मतदारसंघातील एकूण ७५ आपत्तीग्रस्त शेतकरी व पशुपालकांना शासनाने मदत केली होती मात्र आमदार संजय बनसोडे यांच्या प्रयत्नातून शासनाएवढीच मदत अभय भुतडा फाऊंडेशनच्या वतीने सर्व आपत्तीग्रस्तांना थेट धनादेशाद्वारे देऊन दिवाळीच्या सणामध्ये शेतकऱ्यांची दिवाळी आमदार संजय बनसोडे यांनी गोड केली आहे. मतदार संघातील आपत्तीग्रस्तांना अभय भुतडा फाउंडेशनच्या वतीने भरीव मदत केली असल्याने आ.संजय बनसोडे यांनी अभय भुतडा यांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत. त्यात मतदार संघातील पाच मयतांना प्रत्येकी चार लाखाप्रमाणे मदत, आत्महत्याग्रस्त चार शेतकऱ्यांना प्रत्येकी एक लाखाप्रमाणे मदत, १४ गायींच्या पशुपालकांना प्रत्येकी ३७,५०० प्रमाणे मदत, ४० म्हैशींच्या पशुपालकांना प्रत्येकी ३७,५००/- मदत, ५ बैलांच्या पशुपालकांना प्रत्येकी ३२ हजाराप्रमाणे मदत, ३ गाईचे व ३ म्हशीचे वासरु यांच्या पशुपालकांना प्रत्येकी २० हजाराची मदत, १२२ शेळी मेंढीच्या पशुपालकांना प्रत्येकी ४ हजारांच्या रूपयाची मदत तर २०५ कोंबडी पालन करणा-यांना प्रत्येकी १०० रु प्रमाणे म्हणजे एकुण ५२ लाख १३ हजार ५०० रुपायाची भरीव मदत करण्यात आली आहे.

## मुस्लिम बांधवांनी विकासासोबत रहावे

### रेणापूर येथील शादी खाना बांधकाम भूमिपूजन प्रसंगी आ. रमेशआप्पा कराड



लातूर :- मुस्लिम बांधवांना भाजपाची भीती दाखवून वर्षानुवर्ष कॉंग्रेसने मते घेतली सत्ता मिळवली मात्र समाजासाठी काहीच केले नाही. भाजपाच्या नेतृत्वातील केंद्र, राज्य शासनाबरोबरच रेणापूर नगरपंचायतीने कुठलाही जाती भेद न ठेवता विविध सर्वांगीण विकासाची कामे केली केलेल्या विकास कामांना साथ द्या भाजपाच्या पाठीशी खंबीरपणे रहा असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर नगरपंचायत अंतर्गत नगर विकास विभागाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मुस्लिम बांधवांसाठी बांधण्यात येणाऱ्या २ कोटी रुपये खर्चाच्या शादीखाना आणि १ कोटी रुपये खर्चाच्या ईदगाह मैदानाच्या संरक्षण भिंत बांधकामाचे भूमिपूजन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते शनिवारी सकाळी झाले.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, तालुक्याचे अमीरसाब शेख युनूस, मौलाना अस्लम, शेख शफीयुद्दीन, मारूफ आत्तार, शेख शहेनशाह, भाजपाचे शहराध्यक्ष अच्युत कातळे, गणेश चव्हाण यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.


गोरगरीब सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू म्हणून देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी अनेक योजना सुरू केल्या या योजनेचा असंख्य गोरगरीब आणि गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळाला. योजनेचा लाभ देताना कधीच भेदभाव केला नाही असे सांगून यावेळी मुस्लिम बांधवांशी संवाद साधताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, रेणापूर नगरपंचायत भाजपाच्या ताब्यात आल्यानंतर विविध कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी आणला. सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, पाणीपुरवठा योजना, रेणुकादेवी मंदिर परिसरात भक्त निवास, बालाजी मंदिर येथे भव्य सभागृह, सम्राट अशोक बौद्ध विहार, अहिल्यादेवी होळकर सभागृह यासह प्रत्येक समाज बांधवांचे हित आणि सोय लक्षात घेऊन अनेक विकासाची अनेक कामे केली कुठलाही भेदभाव केला नाही. त्यामुळे मुस्लिम बांधवांनी बुद्धिभेद करणाऱ्या पासून सावध रहून विकासाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे बोलून दाखविले.

याप्रसंगी आ. रमेशआप्पा कराड यांच्यासमवेत मुस्लिम बांधवांनी अत्यंत मनमोकळेपणाने विविध विषयावर संवाद साधला. मुस्लिम बांधवांसाठी तीन कोटी रुपयांचा एवढा मोठा निधी पहिल्यांदाच मिळाल्याने समाधान व्यक्त करून यावेळी मुस्लिम बांधवांच्या वतीने आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले.

भाजपाचे शेख अजीम, दत्ता सरवदे, दिनकर राठोड, चंद्रकांत कातळे, विजय चव्हाण, उज्वल कांबळे, राजू आलापुरे, उत्तम चव्हाण, महेश गाडे, संतोष राठोड, नारायण राठोड, अंतराम चव्हाण यांच्यासह मुस्लिम बांधव अबूबकर मौलाना, शेख खुदूस, रफिक शिकलकर, अखिल कुरेशी, युनुस शेख, सलीम शेख, सय्यद खुदुस, युसुफ पठाण, मोहसीन सय्यद, हमिद कुरेशी, शेख इसाक, मुसा शेख, रफिक कुरेशी, जहिरोदिन, शाहनवाज खुरेशी, समीर शेख, गफूर खुरेशी, सत्तार फकीर, महबूब फकीर, वसीम शेख, मैनुद्दीन बावचकर, शौकत सय्यद, वाजिद शेख, अफजल सय्यद, चांदसाब फरीद, संदीप बावचकर, युनूस शेख, रफिक बागवान, मुज्ञफर सय्यद, खदीर शेख, गफूर सय्यद, अहमदखा पठाण, आयुब पठाण, बाबुभाई फरीद यांच्यासह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांची कोंडवाडा विभागास भेट - गोमातेचे पूजन व मार्गदर्शन





लातूर :- लातूर महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी मनपा कोंडवाडा विभाग, सिकंदरपूर (कोलू) येथे भेट देऊन गोमातेचे पूजन केले व उपस्थित कर्मचाऱ्यांना स्वच्छता व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. या प्रसंगी कोंडवाडा विभाग प्रमुख श्री. हिरालाल कांबळे, श्री. शंकर आडगळे, अशोक स्वच्छता सेवा मंडळाचे साईड इन्चार्ज श्री. जंगबहादुर पाल, तसेच कोंडवाडा विभागातील कर्मचारी व अशोक स्वच्छता सेवा मंडळाचे कर्मचारी उपस्थित होते. उपायुक्त डॉ. खानसोळे यांनी या भेटीदरम्यान स्वच्छता विभागाच्या कामकाजाची माहिती घेतली तसेच विभागाच्या कार्यपद्धतीत अधिक कार्यक्षमतेने सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी स्वच्छतेच्या कामात सातत्य, प्रामाणिकपणा आणि जनसहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. महानगरपालिकेच्या स्वच्छता उपक्रमांतर्गत कचरा व्यवस्थापन, परिसर स्वच्छता आणि जनजागृती यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने कार्य करावे, असेही आवाहन उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी या वेळी केले.




महाराष्ट्र कर्मचारी युनियन अध्यक्ष : रवींद्र सावंत यांच्या वतीने हॅप्पी दिवाळी निमित्त सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे अनेक पत्रकारांना आपल्या कार्यालयात बोलावून मिठाई व दैनंदिन व्यवहारात वापरण्यात येतील अशा भेट वस्तूचा सेट पत्रकारांना दिवाळीची भेट..! देऊन हार्दिक शुभेच्छा देताना (इंटक) चे नेते : रवींद्र सावंत आणि पत्रकार : कल्याणराव हनवते यांचे हे छायाचित्र.

## सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशावरील हल्ल्याच्या निषेधार्थ लातुरात लातूरकरांचे धरणे आंदोलन



लातूर :भारताच्या सरन्यायाधीशावरील हल्ला करण्याचा प्रयत्न करणाऱ्या ' राकेश तिवारी नामक देशद्रोही वकिलावर कठोर कारवाई करावी. तसेच वकील अनिल शर्मा याच्यावर देशद्रोहाचा खटला भरून त्याला तुरुंगात डांबावे, या मागणीसाठी संविधान प्रेमी लातूरकर जात धर्म बाजूला ठेवून लातुरातील सर्व शिव -फुले -शाहू -आंबेडकरी विचाराच्या डाव्या उजव्या पक्ष संघटना एकत्र येऊन संविधान आणि लोकशाहीसाठी शुक्रवारी १७ ऑक्टोबरला सकाळी ११ ते ४ या वेळेत लातूर शहरातील महात्मा गांधी चौकात व्यापक धरणे आंदोलन करण्यात आले. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश भूषण गवई यांच्यावर एका सनातनी, मनुवादी वकिलाने हल्याचा प्रयत्न करणे म्हणजे भारतीय संविधानावर, लोकशाहीवर हल्ला होय. जिथे सर्वोच्च न्यायाधीश सुरक्षित नाहीत, तिथे सामान्य भारतीय नागरिकांचे काय! त्यामुळे त्या हल्लेखोर जात्याध आणि मनुवादी विचाराच्या राकेश किशोर तिवारी नामक वकिलावर अट्रोसिटी कायद्या अंतर्गत तसेच देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई केली पाहिजे. अशी मागणी धरणे आंदोलनाच्या माध्यमातून सरकारला करण्यात आली. या धरणे आंदोलनात सर्व संविधानप्रेमी लातूरकर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या आंदोलनात रिपाई आठवले गटाचे चंद्रकांत चिकटे, प्रा. यू. डी. गायकवाड, शेकापचे ॲड. उदय गवारे, राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, भटक्या विमुक्ताचे नेते प्रा. सुधीर अनवले, लसाकमचे नरसिंग घोडके, कामगार नेते राजकुमार होळीकर, सेवा निवृत्त कर्मचारी मागासवर्गीय संघटनेचे प्रा. अनंत लांडगे, बसवन्त अप्पा उबाळे, भीमशक्तीचे मोहनराव माने, पँथर अशोक कांबळे, मराठवाडा विकास परिषदेचे प्रा. अर्जुन जाधव, जिल्हाध्यक्ष शिवाजीराव नरहरे, प्रा. अशोक नाईकनावरे, अनिसचे माधव बावगे, प्रा. सुधीर अनवले, युवा भीम सेनेचे पंकज काटे, पत्रकार दीप्परत्न निलंगेकर, बाळ होळीकर, बलांडे सर, प्रा. अनंत लांडगे, नरसिंग घोडके, ॲड. सिरसाट, कालिदास माने, प्रा. प्रवीण कांबळे, सौ. सुनीता आरळीकर सौ., हसूरे, उदगीरच्या सौ. कदीर शेख, प्रताप माने पाटील, रामराजे आत्राम, डॉ. गणेश गोमारे, प्रा. कल्याण कांबळे, सुधाकर गुळवे,यांच्यासह इतर संघटनाचे पदाधिकारी, कार्यकते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## नौदल सामर्थ्याला नवी बळकटी

भारतीय नौदल ताफ्यात अलीकडेच दाखल झालेले आयएनएस अँड्रोथ हे जहाज पाण्याखालील धोक्यांचा शोध घेऊन ते नष्ट करण्यासाठी अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, सेन्सर आणि कम्युनिकेशन तंत्रज्ञानाने सज्ज आहे. उथळ पाण्यात टिकून राहण्याची क्षमता आणि तंत्रज्ञान सुसज्ज यंत्रणा यामुळे दीर्घकालीन ऑपरेशन्स लीलया पार पाडणे यामुळे नौदलाला शक्य होईल.

बिगेडियर हेमंत महाजन भारतीय नौदलाने अलीकडेच 'आयएनएस अँड्रोथ' हे दुसरे अँटिसबमरीन वॉरफेयर शैलो वॉटरक्राफ्ट आपल्या सेवेत समाविष्ट केले. विशाखापट्टणम येथील नेव्हल डॉकयार्डमध्ये कार्यक्रम झाला. 'आयएनएस अँड्रोथ' हे जहाज भारतीय नौदल सामर्थ्याच्या दृष्टिकोनातून 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पाचे उत्तम उदाहरण आहे. कारण, या जहाजातील ८० टक्के भाग स्वदेशी आहेत. 'गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्स म्हणजेच 'जीआरएसई' तयार करीत असलेल्या अशा आठ पाणबुडीरोधी युद्धनौकांच्या मालिकेतील ही दुसरी युद्धनौका आहे. युद्धनौका बांधणीबाबत संरक्षण मंत्रालय आणि 'जीआरएसई' यांच्यात एप्रिल २०१९ मध्ये करार झाला होता. भारतीय नौदलाने 'जीआरएसई' आणि 'कोची शिपयार्ड लिमिटेड' यांच्याकडे अशा १६ युद्धनौकांची मागणी नोंदवली आहे.

आयएनएस अँड्रोथ ७७ मीटर लांबीचे असून, सुमारे १५०० टन वजनाचे आहे. हे किनारी व उथळ पाण्यामध्ये अँटिसबमरीन ऑपरेशन्ससाठी डिझाईन केले आहे. हे जहाज पाण्याखालील धोक्यांचा शोध घेऊन ते नष्ट करण्यासाठी अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, सेन्सर आणि कम्युनिकेशन तंत्रज्ञानाने सज्ज आहे. या जहाजाची उथळ पाण्यात स्थिरपणाने टिकून राहण्याची क्षमता आणि तंत्रज्ञान सुसज्ज यंत्रणा यामुळे दीर्घकालीन ऑपरेशन्स लीलया पार पाडता येणे नौदलाला शक्य होणार आहे. या जहाजाला तीन वॉटरजेट प्रॉपल्शन सिस्टम्स आहेत आणि त्या समुद्री डिझेल इंजिन्सद्वारे चालतात. त्यामुळे 'आयएनएस अँड्रोथ' अत्यंत जलद आणि मोनोरेच्युल आहे. हे जहाज अँटिसबमरीन युद्धाबरोबरच समुद्री निरीक्षण, शोध व बचाव कार्य, किनारी संरक्षण मोहिमा, तसेच कमी तीवतेच्या सागरी ऑपरेशन्समध्ये कार्यक्षम भूमिका बजावू शकेल. या जहाजाचे नाव लक्षद्वीप बेटावरून ठेवले असून हे बेट ऐतिहासिक आणि सामरिक महत्त्व असलेले मानले जाते. पूर्वीदेखील 'आईएनएस अँड्रोथ' नावाचे जहाज नौसेनेत होते. त्या जहाजाने २७ वर्षे सेवा दिली. आता नवीन अँड्रोथ त्याची परंपरा पुढे चालवेल.

'अँड्रोथ'च्या शस्त्रसज्जतेमध्ये ३० मि.मी. गन आणि दोन १२.७ मि.मी. रिमोट कंट्रोल मशिन गन्स आहेत. तसेच यात उथळ पाण्यातील पाणबुड्या शोधणारे सोनार सिस्टम, डेप्थ चार्जर्स, टॉरपेडोस अशा अत्याधुनिक उपकरणांचा समावेश आहे. जीआरएसई कोलकाता येथे या जहाजाचे बांधकाम झाले असून, यामध्ये ८० टक्के स्वदेशी घटकांचा समावेश आहे. हे भारताच्या 'आत्मनिर्भरता' धोरणाशी संलग्न आहे. यातील अँटिसबमरीन डिफेन्स सूटस् महिंद्रा डिफेन्स सिस्टीम्सच्या सहकार्याने विकसित केले आहेत. ही सिस्टीम्स पाण्याखालील धोक्यांचा शोध घेणे आणि संरक्षण निश्चित करण्याचे कार्य करतात.

भारताच्या विस्तीर्ण सागरी किनाऱ्यामुळे आणि भौगोलिक स्थानामुळे समुद्री सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. चीनच्या अण्वस्त्रसज्ज पाणबुड्यांच्या उपस्थितीमुळे भारतीय महासागरात वाढती सुरक्षा आव्हाने निर्माण होत आहेत. परदेशी शक्तींच्या प्रगत पाणबुडी तंत्रज्ञानामुळे उथळ पाण्यांमधील आणि किनारी भागातील सुरक्षा सुनिश्चित करणे आवश्यक बनले आहे. 'आईएनएस अँड्रोथ' या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरते.

हे जहाज भारतीय नौसेनेच्या स्वदेशीकरणाच्या मोहिमेत आणखी एक यशस्वी पाऊल आहे. या जहाजांच्या निर्मितीमुळे नौदल तंत्रज्ञान आणि घरगुती उद्योगाला चालना मिळते. आठ जहाजांच्या एएसडब्ल्यू-एसडब्ल्यूसी मालिकेत 'आईएनएस अर्नाळा' हे पहिले जहाज असून 'आयएनएस अँड्रोथ' दुसरे आहे. यामुळे भारताच्या लिटोरल ऑपरेशन्सची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आजघडीला १०० पेक्षा अधिक सक्रिय युद्धपोत भारतीय नौसेनेत आहेत. यामध्ये अलीकडेच आयएनएस नीलगिरी, आयएनएस सुरत, आईएनएस वाग्शीर, आईएनएस उदयगिरी, आईएनएस हिमगिरी, आईएनएस तमाल, आईएनएस निस्तार या जहाजांचा समावेश झाला. यामुळे भारताचे समुद्री सामर्थ्य आणि रक्षक क्षमता उच्च पातळीवर पोहोचली आहे. 'आईएनएस अँड्रोथ' हे जहाज केवळ शत्रूच्या पाणबुड्यांपासून निर्माण होणाऱ्या धोक्यांना तोंड देण्यासाठीच नाही, तर स्वदेशी संशोधन, तंत्रज्ञान आणि नवकल्पना यांचे आदर्श उदाहरण आहे. भारतीय नौसैनिक इतिहासात ही एक गौरवाची घटना असून, 'आईएनएस अँड्रोथ' देशाच्या समुद्री सुरक्षा व सामरिक क्षमतांचे प्रतीक ठरले आहे.

भारतीय नौदलाला आधुनिक सामरिक परिस्थितीत जलद आणि प्रभावी प्रतिसादाची क्षमता आवश्यक आहे. समुद्रातील धोके आता फक्त मोठ्या युद्ध जहाजांपुरते मर्यादित नाहीत, तर शत्रूच्या लघू, वेगवान आणि अचूक पाण्याखालील उपग्राहांनी निर्माण केलेले धोकेही खूप गंभीर आहेत. अँड्रोथसारखी अँटिसबमरीन शॅलो वॉटर क्राफ्ट जहाजे या धोक्यांचा तातडीने शोध घेऊन त्यावर नियंत्रण ठेवण्यास सक्षम आहेत. किनारी आणि उथळ पाण्यांमध्ये, जिथे मोठ्या युद्ध जहाजांची हालचाल मर्यादित असते. विशेष कार्यक्षमतेमुळे ही जहाजे पथदर्शक ठरतात. ही जहाजे समुद्री निरीक्षण, शोध आणि बचाव कार्ये, तसेच तटीय संरक्षण मोहिमा पार पाडण्यासाठीही महत्त्वाची ठरतात.

# गरज 'सार्क'च्या पुनरुज्जीवनाची

दक्षिण अशियासमोरची आव्हाने पाहता एकाकी राहणे परवडणारे नाही. त्यामुळे 'सार्क'ला सक्रिय करण्याचा मुद्दा केवळ समृद्धीपुरताच मर्यादित नाही, तर अस्तित्व सिद्ध करणारा असू शकतो.

दोन अब्ज लोकसंख्या असलेला दक्षिण आशिया आज वेगळ्या वळणावर येऊन ठेपला आहे. राजकीय अस्थिरता, आर्थिक मंदी आणि वाढत्या हवामान बदलाच्या संकटामुळे या भागातील देशांना अनेक प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अलीकडच्या काळातील घटनाक्रम पाहिला तर राजकीय व्यवस्थेतील उणिवा लक्षात येत आहेत. नेपाळमध्ये तरुणांच्या नेतृत्वाखालील आंदोलनामुळे पंतप्रधान केपी शर्मा ओली यांना ९ सप्टेंबर रोजी राजीनामा द्यावा लागला. परिणामी नेपाळमध्ये राजकीय अस्थिरतेत भर पडली. बांगलादेशातही नोबेल सन्मान विजेते महंमद यूनुस यांच्या नेतृत्वाखाली बदल होत आहे तर श्रीलंका २०२२च्या आर्थिक संकटातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत आहे.

अर्थात, या घटनेकडे संबंधित देशांचा प्रश्न असल्याचे समजण्याची चूक करू नये. कारण या घडामोडींमुळे दक्षिण आशियातील साामूहिक भवितव्य धोक्यात येत आहेत. दक्षिण आशियात बेरोजगारी वाढत आहे. भ्रष्टाचार, हवामान बदलामुळे स्थलांतर आणि ढिसाळ आरोग्य व्यवस्था यासारखे गंभीर प्रश्न आहेत. या प्रश्नांचा सीमा भागावर साहजिकच परिणाम होतो. एक देशातील महापूर हा दुसर्या देशांतही उलथापालथ करू शकतो. संसर्गजन्य आजाराचा फैलाव देखील सीमेपर्यंतच मर्यादित राहत नाही, तर तो सीमेपलिकडेही संचार करतो.

एका बाजारातील आर्थिक संकटाचा परिणाम संपूर्ण क्षेत्रावर पडतो. दक्षिण आशियातील बहुतांश देश विकसनशील असल्याने पश्चिमी देशांच्या तुलनेत रोजगार आणि आर्थिक स्थिती कमी जास्त होत राहते. अशावेळी १९८५ मध्ये परस्पर सहकार्य वाढण्यासाठी अस्तित्वात आलेली दक्षिण आशिया प्रादेशिक सहकार्य संघटना (सार्क) ही २०१४ मधील शिखर संमेलनानंतर निष्क्रिय झाली. या भागातील भारत ही एक सर्वात मोठी आर्थिक महासत्ता आणि भू राजनीती शक्ती असताना सार्क परिषदेला सक्रिय करण्याची केवळ जबाबदारीच नाही तर गरजेचे देखील ठरत आहे. दक्षिण जग (ग्लोबल साउथ)चा प्रभाव जागतिक राजकारणात वाढत आहे आणि आगामी काळात एकूण जीडीपी परचेंजिग पॉवर पॅरिटीच्या आधारावर ४०-६० टक्क्यांपर्यंत पोचण्याचा अंदाज आहे.

दक्षिण आशिया आजही सर्वात वेगाने वाढणार्या एका भागांपैकी एक आहे. मात्र सध्याच्या घडामोडी पाहता गती संथ होत आहे. जागतिक बँकेच्या दक्षिण अशियाच्या अहवालानुसार, २०२५मध्ये विकासदर ५.८ टक्के राहण्याचा अंदाज असून तो २०२४मध्ये ६ टक्के होता. बांगलादेशातील विकासदर संथ होत आहे आणि पाकिस्तान कर्ज आणि महागाईचा सामना करत आहे. भारतासाठी २०२५-२६ मध्ये ६.३ टक्के विकासदर राहण्याची अपेक्षा आहे. आकडे सक्षम वाटत असले तरी चांगली व्यवस्था नसल्यास प्रादेशिक तणावाचा झटका बसू शकतो. सार्क प्रामुख्याने व्यापार, ऐक्य, सहकार्याला चालना देण्यासाठी अस्तित्वात आले. मात्र अनेक दशकांपासून राजकीय स्पर्धा, प्रामुख्याने भारत आणि पाकिस्तान यांच्यातील ताणाताणीच्या पार्श्वभूमीवर सार्कच्या विकासाला अडथळे आणले.

तरीही सार्क परिषदेची तार्किकता ही पूर्वीच्या तुलनेत अधिक आहे. हवामान बदलाचे उदाहरण घ्या. दक्षिण अशियातील सुमारे निम्मी लोकसंख्या ही धोक्याखाली राहत आहे. जागतिक बँकेने हवामान बदलाच्या दृष्टीने संवेदनशील मानल्या जाणार्या भागात ही लोकसख्या राहत असल्याचे म्हटले आहे. मुसळधार पाऊस, भूस्खलन, हिमनद्या वितळणे, समुद्राच्या पाण्याची पातळी वाढणे आदी गोष्टी लाखो लोकांच्या जीवावर बेतणार्या आहेत. सीमेपलिकडे जात महापूर व्यवस्थापन, संयुक्त आपत्ती निवारण, सर्वसमावेशक इशारा देणारी प्रणाली या गोष्टी नागरिकांचे जीव वाचवणार्या ठरू शकतात. आरोग्याचा देखील कळीचा मुद्दा आहे.

एक सार्क हेल्थ कोऑर्डीनेशन बॉडीचे आकलन केल्यास यात सर्वसमावेशक देखरेख प्रणाली, रॅपिड रिस्पॉन्स टीम आणि संयुक्त स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजरचा समावेश राहिल्यास भविष्यात संसर्गजन्य आजार फैलावण्यास प्रतिबंध करणे सहज शक्य होऊ शकते. साउथ एशिया फ्री ट्रेड एरिया (साफ्टा)चा देखील पूर्णपणे वापर होताना दिसत नाही. रस्ते, रेल्वे, डिजिटल कॉरिडॉर आणि एनर्जी ग्रीडच्या माध्यमातून चांगल्या कनेक्टिव्हीटीतून भरीव आर्थिक मूल्य मिळू शकते. साहजिकच नोकर्या तयार होतील आणि अर्थव्यवस्थेत स्थिरता येईल. यासाठी पोषक राजकीय वातावरण असायला हवे.




महंमद युनूस यांनी सार्क परिषदेला पुन्हा कार्यान्वित करण्याचे आवाहन केले आणि सीमेवरचा ताण कमी करणे आणि सहकार्य वाढविण्यासाठी सार्कसारखी संघटना सक्रिय होणे गरजेचे असल्याचे म्हटले आहे. भारतात जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांच्यासारख्या नेत्यांनी सरकारला 'सार्क'ला प्रादेशिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून त्याचा उपयोग करण्याचा आग्रह केला आहे. यासंदर्भात चर्चा सुरू झालेली नाही. मात्र उपलब्ध संकेतानुसार सार्क पुन्हा कार्यान्वित होऊ शकते, असे चिन्ह आहे. अर्थात अनेक आव्हाने आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यात विश्वासाचा अभाव अजूनही आहे. सदस्य देशांतील अंतर्गत कलह संस्थेला बळकटी देण्यास अपयशी ठरत आहेत.

सार्क केवळ चर्चेचे व्यासपीठ करण्याऐवजी संस्थात्मक सुधारणा करणे गरजेचे आहे. प्रादेशिक भागावर नियंत्रण ठेवणारे सर्वंकष सचिवालय, पारदर्शक फंडिंग व्यवस्था, सुलभ निर्णय प्रक्रिया आणि वाद निकाली काढण्याची व्यवस्था याचा विचार करणे गरजेचे आहे. नियोजनबद्ध रितीने वाटचाल करण्यासाठी 'सार्क' हा एक मार्ग असू शकतो. यासाठी भारत हा वादाचा मुद्दा नसलेल्या गोष्टीपासून सुरुवात करू शकतो. जसे हवामान बदल, इशारा देणारी प्रणाली आणि आरोग्य सुविधा सहकार्य. या आघाडीवर यश आल्यास एकमेकांवरचा विश्वास वाढेल आणि त्यामुळे वाहतूक करार, ऊर्जा देवाणघेवाण, संयुक्त ग्रीड प्रकल्प एवढेच नाही तर कस्टम व्यवस्था यासारख्या उपक्रमातून प्रादेशिक ऐक्याचा मार्ग सुरू होईल.

टीकाकार सार्क जुनाट व्यवस्था झाल्याचे सांगत असताना बिम्सटेक किंवा सीसीआयएनसारख्या अधिक सक्रिय गटांचा दाखला देतात. अर्थात या व्यवस्था चांगल्या असल्या तरी त्यातून कायमस्वरुपी तोडगा निघत नाही. ते केवळ तात्पुरते समाधान आहे. पण 'सार्क'मध्ये संपूर्ण आशियाचा समावेश होतो. अफगाणिस्तानापासून ते मालदिवपर्यंत व्यापक क्षेत्रासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देते. आज बहुध्रुवीय जगात प्रादेशिकतेचा अर्थ वेगळेपणा नसून जागतिक धोरणाशी सुसंगत राहण्यासाठी अस्तित्वात आणणारी लवचिकता आहे. 'सार्क' परिषदेला पुन्हा सक्रिय केल्यास दक्षिण आशियात बहुपयोगी सहकार्याला चालना मिळू शकते. बाह्य शक्तींशी जुळवून घेताना हवामान बदल, व्यापार आणि आरोग्याच्या पातळीवर जागतिक चर्चेत सकारात्मकता आणत सार्वभौमत्व निश्चित करता येऊ शकते.

भारतासाठी अनेक फायदे आहेत. एक सक्षम आणि स्थिर शेजार हा बाह्य धोक्यांपासून सुरक्षा कवच देताना ग्लोबल साउथमध्ये एक जबाबदार नेतृत्वाच्या रुपातून समोर येऊ शकतो. २०२६ मध्ये सार्क हवामान बदल शिखर परिषदेचे यजमानपद घेणे ही एकप्रकारे चांगली सुरुवात म्हणता येऊ शकते. यात सर्वसमावेशक रणनीती, आपत्ती व्यवस्थापन आणि अर्थसाह्यासाठी प्रासंगिक धोरणांचा समावेश करता येऊ शकतो. आरोग्य, पाणी, आपत्ती व्यवस्थापनाच्या तांत्रिक समितीना सक्रिय केल्यास संस्थेला संजीवनी मिळेल. भारताच्या पारदर्शक योगदानातून प्रादेशिक सामूहिक अडचणींवर मात करण्यासाठी एक सार्क निधी उभा करता येऊ शकतो.

# महाराष्ट्रात एसआयआर ?

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आज महाविकास आघाडीचे सर्व ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांचे एक शिष्टमंडळ राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकार्यांना भेटले. महाराष्ट्रातल्या मतदार यादीतील घोळ त्यांनी चोकलिंगम यांच्या कानावर घातला. या चर्चेच्या वेळी अनेक आक्षेप नोंदवले गेले. त्यावर नेमकेपणाने उत्तर देण्यासाठी चोकलिंगम यांनी वेळ मागून घेतला असून उद्या पुन्हा महाराष्ट्रातील निवडणूक निर्णय अधिकारी या शिष्टमंडळाशी चर्चा करणार आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील मतदार यादीचा घोळ काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी राष्ट्रीय पातळीवरून निदर्शनाला आणला.



कर्नाटकात कशाप्रकारे घोळ झाला याचे तपशीलवार वर्णन त्यांनी दोन पत्रकार परिषदांमध्ये केले. त्याचवेळी त्यांनी महाराष्ट्रातही असाच मोठा घोळ झाल्याचा दावा केला होता. आता विधानसभा निवडणुकीसाठीची जी मतदार यादी अस्तित्वात आहे त्याच यादीच्या आधारावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या गेल्या, तर त्या भाजपलाच अनुकूल ठरतील आणि महाविकास आघाडीला ही यादी नुकसानदायक ठरेल हे अगदी स्पष्ट आहे. त्यामुळे महाविकास आघाडीने मनसेला बरोबर घेऊन एकत्रितपणे यावर आवाज उठवला आहे. यात समाजवादी पार्टी, शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट पक्ष अशा सगळ्या छोट्या पक्षांनाही बरोबर घेतले गेले आहे.

त्यांनी आज एकत्रित म्हणणे सादर केल्यानंतर त्यावर विचार करणे मुख्य निवडणूक अधिकार्यांना भाग पाडले आहे. उद्याच्या बैठकीत ते यावर काय भूमिका घेणार यावर सगळे अवलंबून आहे. महाराष्ट्रात झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर केवळ पाचच महिन्यांत विधानसभेच्या निवडणुका झाल्या होत्या. त्यावेळी महाराष्ट्रातील मतदार यादीमध्ये लक्षावधी मतदारांची नावे नव्याने जोडली गेली. हे मतदार इतक्या मोठ्या प्रमाणात कसे वाढले? हा मुख्य आक्षेप आहे. सरासरी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात २५ ते ३० हजार मतदारांची वाढ झाल्याचे काहींचे म्हणणे आहे.

देशाच्या अन्य भागात मतदार यादीमध्ये जसा घोळ झाला तसाच घोळ महाराष्ट्राच्या बाबतीतही झाला आहे, एकाच घराच्या पत्त्यावर असंख्य मतदारांची नावे नोंदवली गेली आहेत. दुबार मतदार नाव नोंदणीचा प्रकारही सर्रास घडला आहे. नाव आणि पत्त्यांचाही घोळ आहे. हे सगळे मुद्दे आज मुख्य निवडणूक अधिकार्यांच्या समोर मांडले गेले आहेत. या अपूर्ण आणि चुकीच्या यादीच्या आधारावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्यायला विरोधी पक्षांचा तीव्र विरोध आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही बिहारप्रमाणे मतदार याद्यांचे विस्तृत फेरतपासणी करणे गरजेचे बनले आहे. बिहारमध्ये अगदी अल्पावधीत हे फेरतपासणी म्हणजेच 'एसआयआर' केले गेले.

अगदी घाईघाईने निवडणुकीच्या तोंडावर राजकीय हेतूने मतदार याद्यांमध्ये घोळ घालण्यासाठीच हा उद्योग केला गेला असा सर्रास आरोप झाला. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपूर्वी घ्यायच्या आहेत, त्यामुळे अशा प्रकारचा एसआयआर उपक्रम महाराष्ट्रात राबवायला फारच कमी वाव आहे. त्यामुळे या याद्यांची दुरुस्ती हे एक अवघड आव्हान सगळ्यांच्या पुढेच उभे आहे. यावर काय तोडगा निघणार हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरले आहे. आजच्या घडामोडीत आणखीन एक बाब ठळकपणे समोर आली, तीही की महाराष्ट्र नवनिर्माण सेना आता अधिकृतपणे भाजपशी फारकत घेऊन महाविकास आघाडीच्या जवळ आली आहे.

अर्थात, तशी अधिकृत घोषणा अद्याप झालेली नसली तरी मनसेच्या शिष्टमंडळाने महाविकास आघाडीच्या नेत्यांसमवेत मुख्य निवडणूक अधिकार्यांची भेट घेणे हे बर्याच अंशाने सूचक मानले जात आहे. काँग्रेसला बरोबर घेण्यात आमची काही अडचण नाही अशी राज ठाकरे यांची भूमिका असल्याचे शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी अलीकडेच जाहीरपणे नमूद केले आहे. तथापि आमची भूमिका आम्ही स्पष्ट करू आमच्या भूमिकेबाबत तिसर्या नेत्यांनी बोलू नये अशी भूमिका मनसेतर्फे मांडण्यात आली आहे, पण आम्ही काँग्रेसबरोबर जाणारच नाही असे मनसेने म्हटलेले नाही किंवा आम्हाला मनसे अजिबातच नको असे काँग्रेसनेही म्हटलेले नाही.

त्यामुळे मनसेसह महाविकास आघाडी भविष्यात आकाराला येऊ शकते असे आजचे वातावरण आहे. किंबहुना त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाची बाब अशी की मनसे आता भारतीय जनता पक्षाबरोबर नाही हे अगदी स्पष्टपणे समोर आले आहे. राज्यातल्या नव्या राजकीय समीकरणाची ही नांदी आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत हे नवे समीकरण भारतीय जनता पक्षाला आव्हानात्मक ठरणार आहे हे निश्चित. अर्थात, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षा पुढे प्रखर आव्हान निर्माण करायचे असेल, तर आधी मतदार यादीतील घोळ दूर होणे आवश्यक आहे. त्यासाठी या सर्वांनी एकत्रित प्रयत्न हाती घेतले आहेत. हे प्रयत्न किती यशस्वी ठरतील यावर निवडणूक निकालाचे भवितव्य अवलंबून असेल.

# रक्तात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर काढून टाकण्यासाठी सकाळी करा 'या' लाल रसाचे सेवन, कोलेस्ट्रॉलसह- मधुमेह राहील नियंत्रणात



धावपळीच्या जीवनशैलीचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येत आहे., सतत काम, आहाराकडे दुर्लक्ष, जंक फूडचे अतिसेवन, पाण्याचा अभाव, मानसिक तणाव, शारीरिक हालचालींचा अभाव इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. त्यामुळे चुकीची जीवनशैली फॉलो न करता कायमच योग्य जीवनशैली फॉलो करणे आवश्यक आहे. सकाळी उठल्यानंतर बऱ्याचदा शरीरात थकवा, अशक्तपणा किंवा ऍसिडिटी वाढू लागते. या सर्व समस्यांमुळे काहीवेळा मूड बिघडून जातो. तसेच कोणतेही काम करण्याची इच्छा होत नाही. चुकीच्या सवयी फॉलो केल्यामुळे मधुमेह, कोलेस्ट्रॉल आणि शरीरसंबंधित इतर आजार वाढू लागतात. या आजाराची लागण झाल्यानंतर शरीरात विषारी घटक तसेच साचून राहतात, ज्याचा आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला सकाळी उठल्यानंतर शरीर डिटॉक्स करण्यासाठी कोणत्या रसाचे सेवन करावे? बीटचा रस प्यायल्यामुळे शरीराला नेमके काय फायदे होतात? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. शरीर डिटॉक्स करण्यासाठी पेय:

सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी चहा किंवा कॉफीचे सेवन करण्याऐवजी बीटच्या रसाचे सेवन करावे. बीट आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. यामध्ये असलेले नैसर्गिक घटक लोहाची कमतरता भरून काढतात. तसेच शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर काढून टाकण्यासाठी उपाशी पोटी बीटच्या रसाचे सेवन करावे. यामुळे आतड्यांमध्ये साचून राहिलेली घाण स्वच्छ होते. बीट आणि चिया सीड्सचा रस नैसर्गिक डिटॉक्सिफायर आहेत. शरीर डिटॉक्स झाल्यामुळे रक्तभिसरण सुधारते आणि शरीराच्या हालचालींमध्ये कोणत्याही अडचणी येत नाहीत. शरीरात साचलेल्या घाणीमुळे काहीवेळा पोटात जडपणा जाणवू लागतो. या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी बीटचा रस प्यावा.

रक्त शुद्ध होते:

रक्तात साचून राहिलेले घाणेरडे कोलेस्ट्रॉल नष्ट करण्यासाठी बीटच्या रसाचे सेवन करावे. याशिवाय बीटमध्ये भरपूर प्रमाणात लोह असते, ज्यामुळे शरीरात निर्माण झालेली लोहाची कमतरता भरून निघते. याशिवाय लाल रक्तपेशी वाढवण्यासाठी बीटचा रस प्यावा. ऍनिमिया सारख्या गंभीर आजारापासून सुटका मिळवण्यासाठी नियमित बीट आणि लोहयुक्त पदार्थांचे रोजच्या आहारात कायमच सेवन करावे.

त्वचेवर नैसर्गिक ग्लो येतो:

सकाळी झोपेतून उठल्यानंतर अनेकांना चेहऱ्यावर सूज किंवा चेहरा काळवंडलेला वाटू लागतो. पण नियमित सकाळी उठून बीटच्या रसाचे सेवन केल्यास त्वचेवर नैसर्गिक चमक येईल आणि चेहरा अतिशय सुंदर दिसेल. यामध्ये असलेले विटामिन सी आणि लोह चेहऱ्यावर आलेले डाग, पिंपल्स आणि पुरळ घालवण्यासाठी मदत करतात. चेहऱ्यावर आलेल्या सुरकुत्या कमी करण्यासाठी बीट आणि चिया सीड्सचे सेवन करावे. याशिवाय बीटच्या रसाचे सेवन केल्यामुळे गॅस, बद्धकोष्ठता आणि पचनाच्या सर्वच समस्यांपासून आराम मिळेल.

बीटमध्ये लोह आणि फॉलिक सिड असल्याने ते रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी वाढवते आणि ऑक्सिजनची पातळी सुधारते. बीटचा रस रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत करतो.

बीट खाण्याचे दुष्परिणाम आणि खबरदारी: बीटमध्ये साखर असल्याने मधुमेहाच्या रुग्णांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच त्याचे सेवन करावे. किडनी स्टोन असलेल्या लोकांनी बीट खाऊ नये, कारण ते हानीकारक असू शकते.

## आतड्यांमध्ये चिकटलेली घाण होईल क्षणार्धात स्वच्छ! रात्री झोपण्याआधी करा 'या' सोनेरी पाण्याचे सेवन, चेहऱ्यावर येईल ग्लो

रोजच्या आहारात खाल्लेल्या सर्वच पदार्थांचा थेट परिणाम शरीरावर होतो. जंक फूड, तिखट किंवा तेलकट पदार्थांचे अतिसेवन केल्यामुळे शरीराला हानी पोहचते. यामुळे ऍसिडिटी, गॅस किंवा शरीरात विषारी घटक साचून राहण्याची शक्यता असते. शरीरात दिसून येणाऱ्या बदलांकडे लक्ष देऊन आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. आतड्यांमध्ये चिकटून राहिलेल्या विषारी घटकांमुळे पोट व्यवस्थित स्वच्छ होत नाही, ज्यामुळे चेहऱ्यावर सतत पिंपल्स येणे, मुरूम किंवा डाग वाढू लागतात. तसेच चेहरा खूप जास्त तेलकट आणि चिकट होऊन जातो. चेहऱ्यावर जमा झालेल्या घाणीमुळे त्वचा अधिकच निस्तेज आणि काळवंडलेली वाटू लागते. चेहऱ्यावरील ग्लो कमी झाल्यानंतर बाजारातील स्किन केअरचा वापर केला जातो.

शरीरात साचून राहिलेल्या घाणीचा आणि विषारी वायूचा परिणाम थेट चेहऱ्यावर होतो, ज्यामुळे पिंपल्स, मुरूम किंवा काळे डाग वाढू लागतात. त्यामुळे आहारात बदल करून सहज पचन होणाऱ्या पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. याशिवाय शरीर स्वच्छ करण्यासाठी नियमित डिटॉक्स पेयांचे सेवन करावे. यामुळे आतड्यांमध्ये साचून राहिलेला विषारी वायू आणि विषारी घटक बाहेर पडून जाण्यास मदत होते. आज आम्ही तुम्हाला चेहऱ्यावर ग्लो मिळवण्यासाठी रात्री झोपण्याआधी कोणत्या पाण्याचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या पाण्याचे महिनाभर नियमित सेवन केल्यास सकारात्मक फरक दिसून येईल.




डिटॉक्स ड्रिंक बनवण्याची कृती:

- बडीशेप
- जिरं
- ओवा
- काळे मीठ
- पाणी

डिटॉक्स ड्रिंक बनवण्यासाठी सर्वप्रथम, टोपात पाणी गरम करण्यासाठी ठेवा. पाण्याला उकळी आल्यानंतर त्यात जिरं, ओवा आणि बडीशेप घालून १० मिनिटं पाणी व्यवस्थित उकळवून घ्या. यामुळे पदार्थांमधील अर्क पाण्यात उतरेल. त्यानंतर गॅस बंद करून पाणी गाळून त्यात चवीनुसार मीठ टाकून मिक्स करून घ्या. त्यानंतर तयार केलेल्या पाण्याचे सेवन करा. डिटॉक्स पेयांचे नियमित सेवन केल्यास चेहऱ्यावर वाढलेले पिंपल्स, मुरुम आणि काळे डाग कमी होऊन चेहऱ्यावर चमकदार ग्लो येईल. याशिवाय शरीरात साचून राहिलेली विषारी घाण बाहेर काढून टाकण्यासाठी हेल्दी पेयांचे सेवन करावे. चेहऱ्यावर नैसर्गिक चमक वाढवण्यासाठी बडीशेप, जिऱ्याचे पाणी प्यावे.

बडीशेपचे फायदे:

जेवणानंतर सगळ्यांचं बडीशेप खाण्याची सवय असते. यामुळे खाल्ले अन्नपदार्थ सहज पचन होतात. बडीशेप त्वचेसाठी अतिशय गुणकारी आहे. यामध्ये असलेले अँटी ऑक्सिडंट्स शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर काढून टाकण्यासाठी मदत करतात. त्वचा नैसर्गिकरित्या ताजीतवानी ठेवण्यासाठी बडीशेप किंवा बडीशेपचे पाणी प्यावे.

जिऱ्याचे फायदे: जेवणातील सर्वच पदार्थ बनवताना जिऱ्याचा वापर केला जातो. जिऱ्यामध्ये अँटीबॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आढळून येतात. त्यामुळे जेवणाला फोडणी देताना जिऱ्याचा भरपूर वापर केला जातो. जिऱ्याचे सेवन केल्यामुळे रक्त शुद्ध होते आणि शरीरातील घाण बाहेर पडून जाण्यास मदत होते. चेहऱ्यावर चमक वाढवण्यासाठी नियमित जिरं, बडीशेप आणि ओव्याचे पाण्याचे न चुकता सेवन करावे.

दिवसातून २-३ वेळा चेहरा धुवा, कारण यामुळे त्वचेवरील घाण आणि तेल निघून जाते. उन्हाळ्यात त्वचेचे संरक्षण करण्यासाठी सनस्क्रीनचा वापर करणे महत्त्वाचे आहे. सामान्य त्वचा रोग आणि त्यांची लक्षणे? जेव्हा त्वचेची छिद्रे तेल, बॅक्टेरिया आणि मृत त्वचेमुळे ब्लॉक होतात तेव्हा मुरुम येतात.एक्झिमा झाल्यानंतर त्वचा कोरडी होते आणि खाज सुटते, त्यामुळे सूज, क्रॅक किंवा खवले येऊ शकतात.

## जेवणाच्या ताटात गरमागरम वरण भातासोबत खाण्यासाठी झटपट बनवा कुरकुरीत मसालेदार कारली फ्राय, नोट करा रेसिपी

कारल्याच्या भाजीचे नाव ऐकल्यानंतर सगळेच नाक मुरडतात. चवीला कडू असलेली कारली खायला कोणालाच आवडत नाही. पण कारलं आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. यामध्ये असलेले घटक शरीरासाठी अतिशय प्रभावी ठरतात. रक्तात वाढलेले साखरेचे प्रमाण नियंत्रणात ठेवण्यासाठी कारल्याच्या रसाचे सेवन करावे. कडू चवीची पौष्टिक भाजी शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर काढून टाकण्यासाठी मदत करते. आज आम्ही तुम्हाला कुरकुरीत मसालेदार कारली फ्राय बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हा पदार्थ गरमागरम भात डाळीसोबत अतिशय सुंदर लागेल. घाईगडबडीच्या वेळी डब्यासाठी भाजी काय बनवावीस सुचत नाही. अशावेळी कारली फ्राय बनवू शकता. लहान मुलांना कारली खायला आवडत नाही, पण या पद्धतीने बनवलेली कारली फ्राय लहान मुलं आवडीने खातील. चला तर जाणून घेऊया कुरकुरीत मसालेदार कारली फ्राय बनवण्याची सोपी रेसिपी. साहित्य: कारली मीठ लाल तिखट हळद धणे पावडर

लिंबाचा रस रवा तांदळाचे पीठ तेल कृती: कुरकुरीत कारली फ्राय बनवण्यासाठी पांढऱ्या रंगाची कारली घ्यावी. कारली स्वच्छ धुवून आतील बिया काढून घ्या आणि बारीक उभ्या आकारात कारली चिरून घ्या.


त्यानंतर कापून घेतलेल्या कारल्यानां मीठ लावून १५ ते २० मिनिटं तसेच ठेवून घ्या. त्यानंतर त्यातील पाणी काढून कारली हाताने दाबून घ्या. यामुळे कडवटपणा कमी होईल. मोठ्या भांड्यात कारली घेऊन त्यात लाल तिखट, चवीनुसार मीठ, हळद, जिऱ्याची पावडर, धणे पावडर, लिंबाचा रस घालून व्यवस्थित मिक्स करा.

ताटात रवा, तांदळाचे पीठ आणि लाल तिखट घालून व्यवस्थित मिक्स करा. तव्यावर तेल गरम करण्यासाठी ठेवा.

मसाला लावलेली कारली रव्यात घोळवून तव्यावरील गरम तेलात कुरकुरीत होईपर्यंत भाजून घ्या. तयार आहेत सोप्या पद्धतीमध्य बनवलेली कुरकुरीत मसालेदार कारली फ्राय.

## सुंदर दिसण्यासाठी जया किशोरी चेहऱ्यावर लावतात स्वयंपाक घरातील 'हे' पदार्थ, त्वचेच्या सौंदर्यात पडेल भर

प्रसिद्ध कथावाचक जया किशोरी सोशल मीडियावर प्रसिद्ध आहेत. त्या कायमच प्रेरणादायी विचारांनी साऱ्यांनाच प्रेरित करतात. सोशल मीडियावर त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. अनेक लोक त्यांना फॉलो सुद्धा करतात. जया किशोरी यांच्या चाहत्यांना त्यांचे सौंदर्यांचे नेमके रहस्य काय? याबद्दल जाणून घेण्याची मोठी उत्सुकता असते. सुंदर दिसण्यासाठी महिला चेहऱ्यावर सतत काहींना काही लावत असतात. स्किन केअर प्रॉडक्ट, लोशन तर कधी फेशिअल करून घेतले जाते. पण काहीवेळा त्वचा अतिशय निस्तेज आणि काळवंडल्यानंतर ती सुधारण्यासाठी खूप जास्त वेळ लागतो. महागड्या केमिकल युक्त स्किन केअर प्रॉडक्टमुळे त्वचा खराब होऊन जाते. त्यामुळे त्वचेला सूट होतील अशाच स्किन केअर प्रॉडक्टचा वापर करावा. चुकीच्या स्किन केअर प्रॉडक्टमुळे चेहऱ्यावर पिंपल्स किंवा मुरूम येतात.

१५ मिनिटांमध्ये गायब होईल चेहऱ्यावरील डेड स्किन! मसूर डाळीमध्ये मिक्स करा 'हा' पदार्थ, चेहऱ्यावर येईल पार्लरसारखा ग्लो

त्वचेच्या समस्या वाढू लागल्यानंतर चेहऱ्याची योग्य काळजी घ्यावी. जया किशोरी त्वचा कायमच हेल्दी आणि चमकदार करण्यासाठी घरगुती पदार्थांचा वापर करतात. घरगुती पदार्थांच्या वापरामुळे चेहऱ्यावर नैसर्गिक ग्लो येतो आणि त्वचा अतिशय सूंदर दिसते.म्हणूनच आज आम्ही तुम्हाला जया किशोरी सुंदर दिसण्यासाठी कोणत्या घरगुती पदार्थांचा वापर करतात? त्यांचे सौंदर्यांचे नेमके रहस्य काय? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. हे उपाय केल्यामुळे चेहऱ्यावर नैसर्गिक ग्लो येतो.

जया किशोरी यांचे स्किन केअर रुटीन: जया किशोरी यांचे सौंदर्यचे रहस्य स्वयंपाक घरातील पदार्थांमध्ये लपलेले आहे. त्यांनी एका मुलाखतीमध्ये सांगितली, बाजारातील महागड्या प्रॉडक्टचा वापर करण्याऐवजी घरगुती उपाय करणे जास्त प्रभावी ठरते. त्या लहानपणापासूनच चेहऱ्यावर दही, बेसनाचा वापर करतात, ज्यामुळे चेहऱ्यावर चमकदार ग्लो येतो आणि त्वचा अधिक सुंदर दिसू लागते. या पदार्थांच्या वापरामुळे चेहऱ्यावर कोणतेही डाग येत नाहीत.

घरगुती फेसपॅक बनवताना वाटीमध्ये बेसन, दही, हळद, घेऊन सर्व पदार्थ एकत्र मिक्स करून करून फेसपॅक तयार करा. तयार केलेला फेसपॅक संपूर्ण चेहऱ्यावर लावून १५ ते २० मिनिटं तसाच ठेवून द्या. या फेसपॅकमध्ये तुम्ही मध किंवा मुलतानी मातीचा सुद्धा वापर करू शकता. त्यानंतर फेसपॅक पाण्याने स्वच्छ धुवून कोरडा करा आणि टोनर लावून ठेवा. यामुळे त्वचा हायड्रेट राहील आणि चेहऱ्यावर नैसर्गिक ग्लो वाढेल.

## ब्रेड बटर खाऊन कंटाळा आला आहे? मग सकाळच्या नाश्त्यासाठी झटपट बनवा पौष्टिक ब्रेड पकोडा, नोट करून घ्या पदार्थ

सकाळच्या घाईगडबडीमध्ये नाश्त्यासाठी ब्रेड बटर किंवा बिस्कीट इत्यादी पदार्थ खाल्ले जातात. पण कायमच ब्रेड खाऊन सगळ्यांचं कंटाळा येतो. सकाळच्या नाश्त्यात हेल्दी आणि टेस्टी पदार्थ खायला सगळ्यांचं हवे असतात. नाश्त्यात कांदापोहे, उपमा, शिरा, इडली, डोसा किंवा ब्रेड बटर खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची सगळ्यांचं इच्छा होते. अशावेळी तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये पौष्टिक ब्रेड पकोडा बनवू शकता. हा पदार्थ लहान मुलांच्या डब्यासाठी किंवा बाहेर फिरायला जाताना बनवून नेण्यासाठी अतिशय उत्तम आहे. सकाळच्या वेळी पोटभर नाश्ता करूनच कामासाठी बाहेर जावे. कारण उपाशी पोटी दीर्घकाळ राहिल्यामुळे चक्कर किंवा अशक्तपणा येण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे सकाळी पोटभर नाश्ता करावा, ज्यामुळे संपूर्ण दिवस आनंद आणि उत्साहामध्ये जातो. चला तर जाणून घेऊया ब्रेड पकोडा बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

- ब्रेड
- कांदा
- गाजर
- भोपळा
- हिरवी मिरची
- कोथिंबीर
- सातूचे पीठ
- पांढरे तीळ
- चीज
- हळद
- गरम मसाला
- बेसन




कृती:

पौष्टिक ब्रेड पकोडा बनवण्यासाठी, सर्वप्रथम भांड्यात किसलेला गाजर, दुधी भोपळा, बारीक चिरलेला कांदा आणि कोथिंबीर घालून व्यवस्थित मिक्स करा.

त्यानंतर त्यात बारीक चिरलेली हिरवी मिरची, सातूचे पीठ, बेसन, चवीनुसार मीठ, लाल तिखट आणि हळद घालून मिक्स करून घ्या.

तयार केलेल्या मिश्रणात आवश्यकता वाटल्यास पाणी घालावे, जास्त पाणी घातल्यामुळे मिश्रण पातळ होण्याची शक्यता असते.

भाज्यांचे तयार केलेले मिश्रण ब्रेडच्या दोन्ही बाजूने लावून त्यात किसलेले चीज टाकून फोल्ड करून घ्या.

कढईमधील गरम तेलात तयार केलेला पकोडा टाकून दोन्ही बाजूने तळून घ्या. पकोडा कायमच मंद आचेवर टाळावा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला पौष्टिक ब्रेड पकोडा. हा पदार्थ पुदिन्याच्या चटणीसोबत किंवा सॉससोबत अतिशय सुंदर लागेल.

## दिवाळीनिमित्त प्रवास करणाऱ्यांसाठी लालपरी महागच...!



लातूर : दिवाळी सणानिमित्त राज्य परिवहन महामंडळाने अतिरिक्त वाहने आणि फेऱ्या वाढविल्या असल्या तरी लालपरीचे भाडे मात्र सर्वसामान्य जनतेला न परवडणारे आहे. यामुळेच सर्वसामान्य प्रवासी खासगी बसने प्रवास करण्याला प्राधान्य देत असल्याचे दिसून येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सर्वसामान्य जनतेची जिव्हाळ्याची असलेली लालपरी आता प्रवाशांना आर्थिकदृष्ट्या त्रासदायक ठरत आहे.

लातूर जिल्ह्यातील बहुतांश नागरिक व्यवसाय, नोकरी, उद्योग, कामधंदा, शिक्षणासाठी मुख्यत्वे पुणे, मुंबई, छत्रपती संभाजी नगर, नाशिक या महानगरामध्ये वास्तव्यास आहेत. या महिन्यात दिवाळी साजरी करण्यासाठी बहुतांश नागरिक आपल्या गावाकडे येत असतात. मात्र शासनाच्या लालपरीचे भाडे पाहिले तर हे सर्वसामान्य जनतेला परवडणारे नाही. मुंबईहून लातूर येणाऱ्या आणि परत मुंबईकडे जाण्यासाठी प्रवाशांना साध्या बसमध्ये ८२५ ते ११२० रुपये, शिवशाही १२२० ते १३१९ रुपये तर शिवनेरी १८२६ ते २१७८ रुपये दर निश्चित करण्यात आले आहेत. लातूर-पुणे-लातूर यासाठी साध्या बसमध्ये ५५४ ते ७५२ रुपये, शिवशाही ८१९ ते ८८५ रुपये, शिवनेरी १२२५ ते १४६१ रुपये भाडे आकारण्यात आले आहे. लातूर-छत्रपती संभाजी नगर-लातूर या मार्गासाठी साधी बस ४९३ ते ६७० रुपये, शिवशाही ७३० ते ७८९ रुपये, शिवनेरी १०९१ ते १३०२ रुपये प्रवासी भाडे आहे. लातूर- नाशिक या दरम्यान प्रवासासाठी साध्या बसमध्ये ७५५ ते १०२५ रुपये, शिवशाही १११६ ते १२०७ रुपये तर शिवनेरीसाठी १६७० ते १९९२ रुपये भाडे आकारण्यात येत आहे. तर दुसरीकडे या लालपरीला पर्याय म्हणून खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे प्रवासी दर परिवहन मंडळाच्या प्रवासी भाड्यापेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. या काळात लातूर-मुंबई दरम्यान प्रवासासाठी ७०० ते ८०० रुपये, मुंबई-लातूर १७०० ते १८०० रुपये, लातूर-पुणे ४०० ते ७०० रुपये, पुणे-लातूर १२०० ते १४०० रुपये, लातूर-छत्रपती संभाजीनगर ४०० ते ५०० रुपये तर छत्रपती संभाजीनगर -लातूर या प्रवासासाठी ८०० ते १००० रुपये भाडे घेण्यात येते. तर लातूर-नाशिक-लातूर १२०० ते १५०० रुपये भाडे खासगी बस वाहतूक करणारे घेत आहेत. एकंदरीत शासनाची लालपरी आणि खासगी प्रवासी वाहतूक बस यांच्या प्रवासी दरातील तफावत पाहता नागरिक खासगी बसने प्रवास करण्याला प्राधान्य देत आहेत. दिवाळीमध्ये खासगी बस वाहतूकदार भाववाढ करतात, जास्तीचे तिकीट घेतात असा सूर आवळला जातो. यामुळे आमची बदनामी होते यासाठी लातूर जिल्हा ट्रॅव्हल्स असोशिएशनने प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे अर्ज करून खासगी प्रवासी बसेसचे दर ठरवून आम्हाला सन्मानाने प्रवासी वाहतूक करण्याची संधी द्यावी अशी मागणी केली आहे.

# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील ६५ वर्षीय बेवारस महिलेचे ९ महिन्यांच्या उपचारानंतर सेवाभावी संस्थेमार्फत पुनर्वसन

लातूर / प्रतिनिधी :- २७ जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी काळे हॉस्पिटल, लातूर जवळ आढळून आलेल्या अनोळखी ६५ वर्षीय बेवारस महिलेस १०८ रुग्णवाहिकेद्वारे पुढील उपचारासाठी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर येथे दाखल करण्यात आले होते. महिला बोलण्यास व चालण्यास असमर्थ होती तसेच तिला तीव्र अशक्तपणा जाणवत होता. त्यामुळे औषधवैद्यकशास्त्र विभागातील वार्ड क्रमांक ११ मध्ये तिचे दाखल करण्यात आले. समाजसेवा अधीक्षक विभागामार्फत तिची ओळख पटविण्याचा




प्रयत्न करण्यात आला, परंतु ती माहिती देण्याच्या स्थितीत नव्हती व तिच्याजवळ कोणताही ओळख पुरावा किंवा नातेवाईक नव्हता. सुमारे नऊ महिने डॉक्टर, अधिपरिचारिका आणि आयांनी सातत्याने उपचार व शुश्रूषा करून तिची प्रकृती सुधारण्यात यश मिळविले. उपचार पूर्ण झाल्यानंतर संबंधित डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तिला डिस्चार्ज देण्यात आला. रुग्ण बेवारस असल्याने समाजसेवा अधीक्षक विभागाने रुद्र प्रतिष्ठान, लातूरचे श्री. प्रशांत एवरीकर यांच्याशी संपर्क साधला. या संस्थेमार्फत डॉ. राजेंद्र धामणे सेवा प्रतिष्ठान, अहिल्यानगर येथे रुग्ण पुनर्वसनासाठी व्यवस्था करण्यात आली. ही कार्यवाही अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, उप अधिष्ठाता डॉ. अजय ओहाळ, डॉ. उमेश कानडे, तसेच वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेत रुद्र प्रतिष्ठान, समाजसेवा अधीक्षक विभाग, आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. सदर कार्यवाहीत समाजसेवा अधीक्षक श्री. संजय कांबळे, श्री. सुरेंद्र सूर्यवंशी व श्री. रमेश इंगळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## लातूर येथील विलासराव देशमुख अतिविशेषोपचार रुग्णालयामध्ये OCT (ऑप्टिकल कोहेरन्स टोमोग्राफी) ही अत्याधुनिक हृदयउपचार पध्दती यशस्वीपणे पडली पार.



लातूर :- लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय अतिविशेषोपचार रुग्णालयामध्ये OCT (ऑप्टिकल कोहेरन्स टोमोग्राफी) मार्गदर्शित क्रिटिकल L-D अँजिओप्लास्टीचा प्रकार ही एक अत्याधुनिक हृदय उपचार पद्धत प्रथमच यशस्वीपणे पार पडली आहे, ज्यामुळे मराठवाड्यात हृदयरोग उपचार क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू झाला आहे. जडढ हे नवीनतम इमेजिंग तंत्रज्ञान असून, ते प्रकाशाच्या सूक्ष्म तरंगांचा वापर करून हृदयातील रक्तवाहिन्यांच्या आतील भागाचे अतिशय तपशीलवार (Microscopic) चित्र दाखवते. पारंपरिक अँजिओग्राफीमध्ये केवळ रक्तवाहिन्यांचा आकार आणि प्रवाह दिसतो, परंतु OCT मुळे त्या रक्तवाहिन्यांच्या भिंतीतील चरबी, प्लाकचे स्वरूप, तुटलेले भाग, तसेच स्टेंट किती चांगला बसला आहे याचे नेमके मूल्यांकन करता येते. त्यामुळे हृदयविकार उपचार अधिक अचूक, सुरक्षित आणि दीर्घकाळ टिकणारे ठरतात. या यशस्वी उपचारामुळे विलासराव देशमुख शासकीय अतिविशेषोपचार रुग्णालय हे अत्याधुनिक कार्डियाक इंटरव्हेन्शन सुविधांमध्ये एक महत्वाचे केंद्र म्हणून उदयास आले आहे. विलासराव देशमुख अतिविशेषोपचार रुग्णालय, लातूर येथे आम्ही OCT मार्गदर्शित क्रिटिकल L-D प्लास्टी यशस्वीपणे केली असुन ही प्रक्रिया मराठवाड्यातील शासकीय रुग्णालयामध्ये प्रथमच करण्यात आली आहे. सदरील शस्त्रक्रीया ही डॉ. संतोष कवठाळे प्राध्यापक व विभागप्रमुख हृदयरोगशास्त्रज्ञ मार्गदर्शनाखाली डॉ. परमेश्वर खोडके सहाय्य प्राध्यापक, डॉ. चंद्रशेखर गोरे सहाय्यक प्राध्यापक, डॉ. श्रीशैल्य जळकोटे व डॉ. शैलेश मठपती वरीष्ठ निवासी यांच्या पथकाने OCT (ऑप्टिकल कोहेरन्स टोमोग्राफी) ही यशस्वी शस्त्रक्रिया पार पाडली. यावेळी संस्थेचे अधिष्ठाता, डॉ. उदय मोहिते, उप अधिष्ठाता डॉ. मंगेश सेलुकर, विशेष कार्य अधिकारी अतिविशेषोपचार रुग्णालय, डॉ. सुनिल होळीकर, प्राध्यापक व विभागप्रमुख औषधवैद्यकशास्त्र विभाग डॉ. निलिमा देशपांडे, वैद्यकीय अधिक्षक डॉ. सचिन जाधव, डॉ. हनुमंत किनीकर सहयोगी प्राध्यापक मज्ञततुशल्यचिकित्साशास्त्र, डॉ. रुद्रमणी स्वामी सहयोगी प्राध्यापक मुत्रपिंडविकारशास्त्र, डॉ. सुमित वाघमारे वैद्यकीय अधिकारी, श्रीमती अमृता पोहरे अधिसेवका, हे उपस्थित होते.

संस्थेच्या अतिविशेषोपचार रुग्णालयामध्ये अशा अनेक दुर्मिळ शस्त्रक्रिया महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेच्या माध्यमातुन मोफत पार पाडण्यात येत आहेत. तरी लातूर जिल्हयातील व आसपासच्या जिल्हयातील गरजु रुग्णांनी जास्तीत जास्त या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते यांनी केले.

## दिपवाळी फराळ, अभ्यंगस्नान किट, गुलाब जामून, साडया व आकाश कंदिलाचे वाटप

लातूर- आदर्श मैत्री फाऊंडेशनच्या वतीने गेली १० वर्षा प्रमाणे याही वर्षी समाजातील वंचित-गरजू-अनाथ घटकातील लोकांसोबत दीपावली साजरी करत त्यांना फराळ, अभ्यंगस्नान किट, गुलाब जामून, साडया व आकाश कंदिलाचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचे काम केले

दरवर्षी फक्त वंचित घटकातील कुंटुंबास दिवाळी फराळ वाटप करणे इतकाच हेतू नसून या भागातील नवीन पिढी, मुल शिक्षणाच्या प्रवाहात आली पाहिजेत, त्यांचे आरोग्य चांगले राहिले पाहिजे,त्यांना सर्व योजनाचा लाभ मिळाला पाहिजे ज्यासाठी आदर्श मैत्री फाऊंडेशनच्या वतीने सर्वोतपरी प्रयत्न करत असल्याचे मत फाऊंडेशनचे अध्यक्ष संतोष बिराजदार यांनी प्रास्ताविक मध्ये व्यक्त केले,आदर्श मैत्री चे काम नेहमीच आदर्श राहिले आहे.समाजातील शेवटच्या घटकाचा विचार करून हे फाऊंडेशन कार्य करत असते आदर्श मैत्री च्या वतीने दीपावली फराळ वाटप करताना आनंद तर होतच आहे पण या बरोबर येथील प्रत्येकांनी मुलांना शिक्षण देणे गरजेचे आहे,त्याच बरोबर प्रत्येकांना पक्की घरे बांधण्यासाठी सर्वोतपरी सहकार्य करून सर्वाचे जीवन मान उंचापाण्याचे काम करण्याचं मदत करून पुढील वेळी येथे आल्यावर पालीची घरे न दिसता पक्की घरे दिसतील यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे मत शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले .येथील विध्यार्थ्यास शिक्षणा साठी ची सर्व मदत मी करणार असल्याचेन मत प्रा. शिवराज मोटेगावकर यांनी व्यक्त केले. यावेळी आदर्श मैत्री फाऊंडेशनचे अध्यक्ष संतोष बिराजदार, समाज कल्याणचे विभागीय उपायुक्त अविनाश देवसटवर,संचालक प्रा शिवराज मोटेगावकर, तुकाराम पाटील, निलेश राजमाने, शशिकांत पाटील, विवेक सौताडेकर, सच्चिदानंद ढगे, विवेक ढगे, राम स्वामी, रमेश बिरादार, संपत जगदाळे, ड दासराव शिरुरे, राजेश मित्तल, सूर्यकांत कटारे, राजकुमार अग्रवाल, अरविंद औरादे, प्रमोद भोयरेकर, आसिफ शेख,उत्तम देशमाने इस्माईल शेख, प्रवीण सूर्यवंशी,श्रीकांत हिरेमठ, प्रमोद टेकले, महेश कदम, मदन भगत, गुलाब शेख उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी नवघरे यांनी केले तर आभार शिवराज मोटेगावकर यांनी मानले.

# सुकळी येथील ग्रामसेवक व सरपंच यांनी संगणमत करून १५ व्या वित्त आयोगाच्या कामात लाखो रुपयाचा केला भ्रष्टाचार

### खोटी बिले दाखवून निधी हडप करणाऱ्या ग्रामविकास अधिकारी व सरपंच यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत-अमर गायकवाड

केज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्या मो.नं.९४०५२३२४२५ या क्रमांकावर आमच्या प्रतिनिधींनी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता गट विकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांनी आमच्या प्रतिनिधींचा फोन घेतला नसल्यामुळे संपर्क होऊ शकला नाही.

सुकळी ग्रामपंचायत कार्यालया कडून सॅनिटरी मशीन ही आज रोजी पर्यंत आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस अद्यापही मिळाली नाही. त्याचबरोबर सदर मशीनची आमच्या शाळेला अग्रज नाही आमची शाळा इयत्ता चौथी पर्यंत असल्यामुळे आम्हाला त्या मशीनची आवश्यकता नाही. जि.प.प्रा.शाळेचे मुख्याध्यापक विनायक आव्हाड

तत्कालीन ग्रामविकास अधिकारी मधुकर पवार यांच्या मो.नं.९९२१०२८१० या क्रमांकावर आमच्या प्रतिनिधींनी संपर्क केला असता सदर मोबाईल दूरध्वनी हा संपर्क क्षेत्राच्या बाहेर असल्याचे सांगण्यात येत होते त्यामुळे संपर्क होऊ शकला नाही.


ामच्या प्रतिनिधी यांनी सुकळी ग्रामपंचायत कार्यालयाच्या ग्रामविकास अधिकारी श्रीमती एस.एम.राऊत मॅडम यांच्या मो.नं.९८५०८७५०७० या क्रमांकावर संपर्क केला असता त्यांनी आमच्या प्रतिनिधींचा फोन घेतला नाही.

केज/प्रतिनिधी सुकळी येथील ग्रामपंचायत कार्यालयाचे ग्रामसेवक व सरपंच यांनी संगणमत करून १५ व्या वित्त आयोगाच्या कामात लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केला असून खोटी बिले दाखवून निधी हडप करणाऱ्या ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत अशा आशयाचे लेखी निवेदन केज तहसीलदार व गटविकास अधिकारी यांना अमर गायकवाड यांनी दिले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सन २०२३ मध्ये सुकळी ग्रामपंचायत कार्यालयाचे तत्कालीन ग्रामसेवक पवार व सरपंच नितीन गायकवाड यांनी मिळून १४ व्या व१५ वित्त आयोगामध्ये तब्बल साडेआठ लाख रुपयाचा भ्रष्टाचार केला होता. परंतु शासनाने त्यावर कोणतेच कारवाई केलेली नाही त्यानंतर सन २०२३ मध्ये ग्रामविकास अधिकारी एस.एम. राऊत यांनी पदभार घेतला, त्यानंतर त्यांनी सुद्धा सरपंच यांच्या सोबत संगणमत करत पंधराव्या वित्त आयोगामध्ये अद्यापही एकही रुपया खर्च न करता तब्बल १३ लाख २६ हजार रुपये एवढा मोठा घोटाळा केलेला आहे. यामध्ये पवार ग्रामविकास अधिकारी असताना ईश्वरी एंटरप्राइजेस या गुत्तेदारासच सर्व टेंडर देऊन तब्बल ८ लाख ५० हजार रुपयांचा घोटाळा केला आहे. त्यानंतर ग्रामविकास अधिकारी एस.एम.राऊत यांनीही ईश्वर एंटरप्राइजेस या एकाच गुत्तेदारास काम देऊन सदरचा सर्व घोटाळा केलेला आहे. दिनांक २९ मे २०२३ रोजी आर.ओ. शेड १ लाख ६१ हजार ४५४ रुपये, दिनांक २९ मे २०२३ रोजी संगणक संच ८० हजार रुपये, २९ मे २०२३ रोजी सौर पथ दिवे४० हजार ३६४ रुपये, दिनांक २९ मे २०२३ रोजी टीआयसी खरेदी१० हजार रुपये, दिनांक १९ जून २०२३ रोजी नाली बांधकाम१ लाख ५९ हजार रुपये, दिनांक व खरेदी केलेल्या वस्तूंची आणि काम केलेले ची उपलब्ध मजकूर नाही परंतु एकूण खरेदी २ लाख ४८ हजार ११८ रुपये, दिनांक व खरेदी अथवा काम केलेल्यांची नाव उपलब्ध नसून एकूण खरेदी१७ लाख ३६ हजार ४६ रुपये, दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी इन्स्टॉलेशन ऑफ आर ओ प्लांट२७ हजार ३४० रुपये, दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी कचराकुंडी८० हजार ७२७ रुपये, दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी पाईपलाईन व विद्युत पंप८४ हजार ५४७ रुपये, दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी स्पोर्ट साहित्य खरेदी२१ हजार ५२७ रुपये, दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी इलेक्ट्रिकलसिटी बिल,इंटरनेट बिल, प्रिंटर चार्जेस २१ हजार ५२६ रुपये, दिनांक ४ मार्च २०२५ रोजी गणराज मोटार दुरुस्ती ९ हजार ९९० रुपये, दिनांक २ एप्रिल २०२४ रोजी सदस्य भत्ता ३० हजार रुपये, दिनांक २९ मे २०२३ रोजी अंगणवाडी खेळणी२० हजार रुपये, दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी इन्स्टॉलेशन ऑफ सॅनिटरी मशीन १४ हजार २९१ रुपये, दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी इन्स्टॉलेशन ऑफ सॅनिटरी वेंडिंग२८ हजार ५८२ रुपये, दिनांक ४ मे २०२४ रोजी आर ओ प्लांट बसवणे१३ हजार ६७० रुपये, दिनांक ४ मे २०२४ रोजी सॅनिटरी मशीन ४७ हजार ६३ रुपयांची वरील नमूद सर्व कामे झालेली अथवा करण्यात आलेली नाहीत. तसेच ग्रामपंचायत सदस्य यांना सुद्धा कोणत्याच प्रकारचा भत्ता देण्यात आलेला नाही. सन २०२३ मध्ये अंगणवाडी करिता खेळणी यासाठी २० हजार रुपये खर्च करून खेळणी आणल्याचे दाखवण्यात आलेले आहे, परंतु याबाबत अंगणवाडी सेविका यांना लेखी पत्र देऊन विचारणा केली असता त्यांनी लेखी पत्राद्वारे अशा प्रकारची खेळणी अंगणवाडीस कधीच मिळालेले नाहीत असे स्पष्ट लिहून दिलेले आहे. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांनी देखील सॅनिटायझर मशीन खरेदीच्या नावाखाली तीन वेळा बिले दाखवून पैसे उचलण्यात आले आहेत. याबाबत देखील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक यांना याबाबत पत्रव्यवहार करून विचारणा केली असता त्यांनी ही या गोष्टी स्पष्ट नकार दिला आहे तसेच त्यांच्या असे मत आहे की, सॅनिटरी मशीन ही इयत्ता आठवी व त्यावरील शाळेतील मुलींच्या वापरासाठी आवश्यक असते आमच्याकडे इयत्ता चौथी पर्यंत शाळा आहे त्यामुळे आम्हाला सॅनिटरी मशीनची आवश्यकताच भासत नाही व अशी कोणत्या प्रकारची सॅनेटरी मशीन आम्हाला मिळालेली नाही. तसेच दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी चे पाईपलाईन व विद्युत पंप यासाठी ८४ हजार ५४७ रुपयाचे बिल खर्च आलेले आहे परंतु सन२०२५ मध्ये जल जीवन योजनेमध्ये सुकळी ग्रामपंचायत साठी ८ लाख ५० हजार रुपये खर्च करून जलजीवन विभागाने गावासाठी पाण्याची सोय केलेली आहे व दोन पाच एचपी च्या विद्युत मोटर पुरवलेल्या आहेत. जर ग्रामपंचायतने८० हजार रुपये खर्च करून संगणक संच आणला होता तर हे चार्जेस कोणाला दिले. तसेच ही सर्व खरेदी २०२३ व २०२४ मध्ये ठराविक एका महिन्यामध्येच करण्यात आलेली आहे तसेच ही विविध कामे एकाच ईश्वर एंटरप्राइजेस नावाच्या कंपनीला देण्यात आलेले आहेत असे प्रकारे पंधराव्या वित्त आयोगामध्ये एक रुपयाही खर्च न करता खोटी बिले दाखवून ग्रामविकास अधिकारी व सरपंच यांनी मिळून संपूर्ण निधी हडप केला आहे असे लेखी निवेदनात अमर गायकवाड यांनी म्हटले आहे व अशा आशयाची लेखी निवेदन तहसीलदार केज, गट विकास अधिकारी पंचायत समिती केज, आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजी नगर, जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना निवेदनाच्या प्रती देण्यात आलेल्या आहेत.



## येवता जि.प.गटातून सौ. प्रियंकाताई अमोल डोईफोडे यांनी निवडणूक लढवावी कार्यकर्त्यांची मागणी

केज/प्रतिनिधी येवता जिल्हा परिषद गटातून सौ. प्रियंकाताई अमोल डोईफोडे यांनी निवडणूक लढवावी अशी मागणी कार्यकर्त्यांतुन जोर धरत आहे.येवता जिल्हा परिषद गटात सरपंच अमोल डोईफोडे यांना मानणारा एक मोठा वर्ग असुन सरपंच अमोल डोईफोडे यांच्या समवेत युवकांची एक मोठी फळी आहे.व डोईफोडे यांचा सर्व समाज बांधवा समवेत जनसंपर्क चांगला आहे. त्याचबरोबर स्व.लक्ष्मण डोईफोडे यांचे कार्य देखील चांगले होते.त्यांनी सतत सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेले आहे. स्व.लक्ष्मण डोईफोडे यांचा वारसा पुढे नेहण्याचे काम अमोल डोईफोडे व त्यांच्या पत्नी सौ. प्रियंकाताई अमोल डोईफोडे हे करत आहेत.



सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करत आहेत वेळोवेळी गोरगरिबांच्या मदतीला धावून येत आहेत. त्यांच्या जनसंपर्कामुळे येवता जिल्हा परिषद सर्कल मधून प्रियांकाताई डोईफोडे यांनी निवडणूक लढवावी अशी कार्यकर्त्यांची व जनसामान्याची मागणी जोर धरत आहे.

## जिल्हा प्रशासन अधिकारी(नपा) अजित डोके व उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या हस्ते 'मालमत्ता कर मोबाइल व्हॅन' सेवेचा शुभारंभ

### १० नोव्हेंबरपर्यंत ८०% शास्ती माफी योजना लागू; नागरिकांना दारीच कर भरण्याची सुविधा

लातूर (प्रतिनिधी): लातूर महानगरपालिका कर आकारणी व कर संकलन विभागाने यंदा १०० कोटी रुपयांच्या मालमत्ता करवसुलीचे लक्ष्य ठेवले असून, त्याच्या पूर्ततेसाठी विविध अभिनव उपक्रम राबविले जात आहेत. करदात्यांच्या सोयीसाठी आता 'स्मार्ट करसंकलन प्रणाली – मोबाइल व्हॅन सेवा' सुरू करण्यात आली आहे. ही सेवा आयुक्त व प्रशासक सौ. मानसी आणि उपायुक्त (कर संकलन) डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आली. या व्हॅनचे उद्घाटन जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरपालिका) श्री. अजित डोके आणि उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास कर अधीक्षक प्रतिक मुसांडे, भांडारपाल






बालाजी शिंदे, क्षेत्रीय अधिकारी बंडू किसवे, आणि संतोष लाडलपुरे उपस्थित होते. या मोबाइल व्हॅनमुळे नागरिकांना आपल्या दारातच मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. तसेच सध्या सुरू असलेल्या ८०% शास्ती माफी योजनेची माहिती या व्हॅनमार्फत शहरातील नागरिकांपर्यंत पोहोचवली जात आहे. डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे नागरिकांना कर भरणे सुलभ होईल, तसेच करवसुलीला गती मिळेल. नागरिकांनी १० नोव्हेंबरपर्यंतच्या शास्ती माफी योजनेचा लाभ नक्की घ्यावा. व्हॅनमध्ये संगणक, प्रिंटर, सॉफ्टवेअर प्रणाली, ऑपरेटर, ड्रायव्हर आणि सुरक्षा रक्षक यांची सोय करण्यात आली आहे. या व्हॅनद्वारे धनादेश, डेबिट कार्ड, एटीएम कार्ड किंवा णझख (धनाकर्ष) द्वारे तत्काळ कर भरण्याची आणि पावती मिळविण्याची सोय उपलब्ध आहे. महानगरपालिकेने सर्व थकबाकीदार मालमत्ता धारकांना दि. १० नोव्हेंबरपर्यंत सुरू असलेल्या ८०% शास्ती माफी योजनेचा लाभ घेऊन थकीत कर तत्काळ भरण्याचे आवाहन केले आहे.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.